# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक ३२३/२०२४ दिनांक- २२/०८/२०२४.

**"मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ तसेच अग्निशस्त्र (पिस्टल) सह ०३ जिवंत राऊंड यांची विक्री करण्याकरीता आलेल्या आरोपीतास पकडण्यास काशिमिरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"**

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री करणारे, बाळगणारे तसेच बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत वरीष्ठांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या होत्या.

दिनांक १४/०८/२०२४ रोजी एमआयसीएल बिल्डींगच्या समोरील रोडवर, ठाकुर मॉलच्या पाठीमागे, महाजनवाडी, मिरारोड-पुर्व, ता. जि ठाणे, या ठिकाणी एक इसम मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता येणार आहे अशी बातमी मिळाल्याने त्याबाबत वरीष्ठांना कळविण्यात आले असता कारवाई करणेबाबत आदेशित केल्याने वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे आदेशान्वये लागलीच एक पथक तयार करून सदर ठिकाणी छापा मारुन इसम नामे फिरोज सादीक शेख, व्यवसाय-मॅकेनीक, रा. गल्ली नं-०१ बापुजी नगर, हाजी सुलेमान मोहल्ला रोड, राबोडी-१, ठाणे पश्चिम, ठाणे.पि नं ४००६०१ मुळ रा. गल्ली नं-०४, जमलापुरा, पक्का दरवाजा, मरेल कोटला शहर, जि-मरेल कोटला, राज्य- पंजाब यास ताब्यात घेवुन त्यास चेक करून त्याची अंगझडती घेता त्याचे ताब्यात १) **६०,०००/- रु किंमतीचा १२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ २) ५०,०००/- रु किं ची एक १४.५ से. मी. लांबीची ८ एमएम व्यास असलेली काळपट राखाडी रंगाची देशी बनावटीची धातुची पिस्टल ३) ३०००/- रु किं चे पिस्टलचे पिवळया रंगाचे धातुचे ०३ जिवंत राउंड त्यावर इंग्रजीत ख्क्र ७.६५ असे लिहलेले व प्रत्येक राउंडची लांबी २.५ से.मी. व त्याचा व्यास ७ एमएम प्रत्येक राउंडची किंमत रु १०००/- प्रमाणे तसेच प्रत्येकावर इंग्रजीत KF ७.६५ असे लिहलेले असा एकुण १,१३,०००/- रू. किंमतीचा मुददेमाल** मिळून आला असुन तो जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीतास काशिमिरा पोलीस ठाणे गु रजि नं ॥ ४२८/२०२४ एन.डी.पी.एस अधिनीयम १९८५ चे कलम ८ (क), २१ (ब), २९ सह शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम ३, ७, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम-३७ (३), १३५ या गुन्हयात अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास सपोनि योगेश काळे, नेम काशिमिरा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

वरील कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, (परिमंडळ-१), श्री. डॉ.विजय मराठे, सहा.पोलीस आयुक्त, (मिरारोड विभाग), वरीष्ठ पो.नि/राजेंद्र कांबळे, पो.नि समीर शेख (गुन्हे), पो.नि. विठठल चौगले (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि योगेश काळे, पोउपनिरी शिवाजी खाडे, पो.हवा./शिंदे, निकम, सोनकांबळे, मोहिले, पो.अंम/रवि कांबळे, चौधरी, सुर्यवंशी, ठोबळे, कांबळे यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

---------oooo--------